# आर.टी.ई. २५ टक्के ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेकरिता आवश्यक कागदपत्रे (सन २०२०-२१)

| अ.क्र. | कागदपत्राचा प्रकार | वैध कागदपत्रांची सूची |
|---|---|---|
| १ | रहिवासाचा/ वास्तव्याचा पुरावा | आधार कार्ड/पासपोर्ट/देयक/वीज/टेलिफोन बील/घरपट्टी/दुय्यम निबंधक कार्यालयाचा नोंदणीकृत भाडेकरारनामा/वाहन चालविण्याचा परवाना. प्रॉपर्टी टॅक्स देयक/गॅस बुक/बँक पासबुक/ड्रायवींग लायसन्स/रेशनिंग कार्ड/यापैकी कोणतेही एक यापैकी कोणतेही एक. आधारकार्ड, मतदान ओळखपत्र. |
| २ | जातीचे प्रमाणपत्र (वडिलांचे) | तहसिलदार/उपजिल्हाधिकारी/उपविभागीय अधिकारी यांचे प्रमाणपत्र |
| ३ | दिव्यांग प्रमाणपत्र | जिल्हा शल्य चिकित्सक/वैद्यकीय अधीक्षक, अधिसुचित जिल्हा शासकीय रुग्णालय यांचे ४० टक्के पेक्षा जास्त अपंगत्व/दिव्यांग मुलांसाठी वैद्यकीय प्रमाणपत्राचा पुरावा |
| ४ | कुटुंबाचा उत्पन्नाचा दाखला | तहसिलदार नायब तहसिलदार/दर्जापेक्षा कमी नसलेल्या महसूल अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र. उत्पन्नाच्या दाखल्याकरिता Salary Slip/तहसिलदारांचा दाखला/कंपनीचा किंवा Employer चा दाखला गृहीत धरावा (आर्थिक वर्ष २०१८-१९ किंवा सन २०१९-२० या वर्षाचा १ लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेले) |
| ५ | जन्माचा दाखला | ग्रामपंचायत / न.पा / म.न.पा. यांचा दाखला / रुग्णालयातील ANM रजिस्टर मधील दाखला/ आंगणवाडी / बालवाडीतील रजिस्टर मधील दाखला / आई, वडील अथवा पालकांनी प्रतिज्ञा पत्राद्वारे केलेले स्वयंनिवेदन |
| ६ | घटस्फोटित महिला | १. न्यायालयाचा निर्णय.<br>२. घटस्फोटित महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३. बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |
| ७ | न्यायप्रविष्ट असलेल्या घटस्फोटा प्रकरणातील महिला | १. घटस्फोटाचे प्रकरण न्यायप्रविष्ट असल्याचा पुरावा.<br>२. घटस्फोट प्रकरण न्यायप्रविष्ट असलेल्या महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३. बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |

| | | |
|---|---|---|
| ८ | विधवा महिला | १. पतीचे मृत्युपत्र (प्रमाणपत्र)<br>२. विधवा महिलेचा/बालकाच्या आईचा रहिवासी पुरावा.<br>३. बालक वंचित गटातील असल्यास बालकाचे किंवा त्याच्या वडिलांचे जातीचे प्रमाणपत्र व बालक आर्थिक दुर्बल गटातील असल्यास बालकाच्या आईचा उत्पन्नाचा दाखला. |
| ९ | अनाथ बालके | १. अनाथ बालकांच्या बाबतीत अनाथालयाची कागदपत्रे ग्राह्य धरण्यात यावीत.<br>२. जर बालक अनाथालयात राहत नसेल तर जे पालक त्याचा सांभाळ करतात त्यांचे हमीपत्र आवश्यक राहील. |
| १० | एकाकी पालक (सिंगल पॅरेन्ट्स) | विधवा, घटस्फोटित आई अथवा वडिल यांपैकी कोणताही एक पर्याय निवडल्यास निवडलेल्या व्यक्तीचे सर्व कागदपत्र ग्राह्य धरण्यात येतील. |